सिटी ॲक्टिव्हिटी

बुधवार, ६ ऑगस्ट, २०१४
अकोला

## मलकापूर परिसरात सेवाधर्म संस्थेतर्फे वृक्षारोपण

**सेवाधर्म शिक्षण संस्थेतर्फे आयोजन**

मान्यवरांची होती उपस्थिती

**अकोला |** सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेतर्फे मलकापूर परिसरात नुकतेच संस्थाध्यक्ष आर. व्ही. कोठाळे व पदाधिकारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सर्वांनी एक झाड लावणे गरजेचे आहे, असे मत आर. व्ही. कोठाळे यांनी व्यक्त केले. या वेळी संत शिरोमणी सावता माळी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. गुणवंत सोळंके, प्रा. धनंजय कोठाळे यांनी संत सावता महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या वेळी विवेक बैस्कार, गजानन वाघमारे, शिवम जाधव, तुषार हांडे आदी उपस्थित होते,

बुधवार • दि. ६ ऑगष्ट २०१४ मातृभूमि

## सावता माळी पुण्यतिथी साजरी

अकोला, दि. ५ - सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेचे कार्यालयात संत शिरोमणी संत सावता महाराजांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी रा. वि. कोठाळे, गुणवंत सोळंके, प्रा. धनंजय कोठाळे यांनी संत सावता महाराजांचे जीवनाविषयी मार्गदर्शन केले. विवेक बैस्कार, गजानन वाघमारे, शिवम जाधव व तुषार हांडे उपस्थित होते.

सकाळ
अकोला, मंगळवार,
५ ऑगस्ट २०१४
५

# निसर्गाची निगा राखणे प्रत्येकाचे कर्तव्य

## श्री. कोठाळे : सेवाधर्म संस्थेच्या कार्यालयात वृक्षारोपण

**अकोला, ता. ४ :** निसर्गाची निगा राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात एक तरी झाड लावून त्याचे संगोपन केल्यास पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल, असे मत सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्थेचे अध्यक्ष रा.वि. कोठाळे यांनी केले. मलकापूर येथील सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्थेच्या कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रा.वि. कोठाळे होते. त्यांच्या हस्ते संस्थेच्या कार्यालयीन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर पार पडलेल्या छोटेखानी कार्यक्रमात त्यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, वृक्षारोपण ही ईश्वर सेवा असून, ईश्वर ज्याप्रमाणे सर्वांना आशीर्वाद देतो, त्याचप्रमाणे वृक्ष सुद्धा सर्वांना आपली सावली व फळे देतात. निसर्गाची निगा राखणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सर्वांनी एक-एक वृक्ष लावणे नितांत गरजेचे आहे, असे मनोगतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी व शिक्षकांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# संत सावता माळी यांची पुण्यतिथी

**अकोला, ता. ४ :** येथील सेवाधर्म शिक्षण व बहूद्देशीय संस्थेच्या कार्यालयात संत शिरोमणी संत सावता माळी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी रा.वि. कोठाळे, गुणवंत सोळंके, प्रा. धनंजय कोठाळे यांनी संत सावता महाराजांच्या जीवनाविषयी मार्गदर्शन केले. विवेक बैस्कार, गजानन वाघमारे, शिवम जाधव, तुषार हांडे उपस्थित होते.